# जाणीवजागृतीची सुरुवात!



**वैद्यकीयशास्त्र हे केवळ शरीराशी निगडित नसून ते मानवी संवेदनांशीही जोडलेले आहे, ही जाणीव डॉक्टरांसह वैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये रुजवण्यासाठी 'सेहत' संस्थेने वैद्यकीय शिक्षण विभागासह कार्यक्रम राबवले. जागतिक आरोग्यदिनानिमित्त यांबाबत 'सेहत'च्या समन्वयक संगीता रेगे यांच्याशी साधलेला संवाद.**

**टॉक टाइम**

**लिंगभाव जाणीवेसंदर्भातील विषयांचा अंतर्भाव वैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये कधी व का करण्यात आला?**

■ वैद्यकीय शिक्षणामध्ये या विषयाचा अंतर्भाव हा २०१५मध्ये करण्यात आला. तोपर्यंत केवळ महिलांच्याच नव्हे तर तृतीयपंथी, भीन्नपंथी व्यक्तींच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे पाहण्याचा संवेदनशील दृष्टिकोन नव्हता. त्यामुळे आरोग्य विद्यापीठ व डीएमईआर यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्याचे ठरले. विद्यार्थी डॉक्टरांना शिकवणाऱ्या शिक्षकांना त्यादृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले. कुटुंबकल्याण कार्यक्रमासारखा विषय असेल तर त्याची संपूर्ण जबाबदारी महिलांवर देण्यात आली. प्रत्यक्षात तृतीयपंथींसाठी रुग्णालयांची उपलब्धता, क्षयरोग, एचआयव्ही यांसारख्या आजारांच्या उपचारांमध्ये महिलांना देण्यात येणारी दुय्यम वागणूक असे अनेक मुद्दे यात होते.

**या प्रशिक्षणामुळे कोणता बदल झाला?**

■ यामुळे केवळ स्त्री-पुरुषांच्या आरोग्यहक्काबद्दलच नाही, तर अनेक पातळ्यांवर वैद्यकीयदृष्ट्या रुग्णांचे प्रश्न कसे हाताळायला हवेत याचेही भान आले. लैंगिक अत्याचाराची प्रकरणे, बलात्कारासारख्या घटनांमध्ये करण्यात येणाऱ्या चाचण्या थांबल्या, 'एमबीबीएस'च्या अभ्यासक्रमातील बलात्काराशी संबंधित चुकीच्या पद्धतीची माहिती देणारा धडा 'फॉरेन्सिक सायन्स' वगळण्यात आला. 'सेहत'ने यासंदर्भात पाठपुरावा केल्यामुळे ते शक्य झाले. याशिवाय लैंगिक अत्याचार झालेल्या मुलांशी, तसेच महिलांशी संवाद साधण्याचा आणि मनःस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न वाढला.

**औरंगाबाद येथील वैद्यकीय कॉलेजमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला. यातून कितपत परिवर्तन झाले?**

■ प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांना अनेकदा वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून दिलासा दिला जात नाही. मनुष्यबळाचा अभाव असल्याने हे वरचेवर घडते. त्यामुळे अशा महिलेसोबत कुटुंबातील अनुभवी ज्येष्ठ महिलेने प्रसूतीवेळी सोबत असावे, यादृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले. कुटुंबनियोजन असे म्हणण्याऐवजी केवळ गर्भनिरोधक हा संज्ञेतला बदलही महत्त्वाचा ठरला. केवळ गर्भधारणा होऊ नये इतकाच कुटुंबनियोजनाचा उद्देश नसतो, तर कोणत्याही प्रकारच्या संसर्गित आजारांचा धोका टाळण्यासाठी गर्भनिरोधके वापरली जातात. अनेक वर्षांपासून वैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये ग्राह्य मानलेले, मात्र काळानुरूप अपेक्षित असलेले बदल करण्यात आले.

(मुलाखत : शर्मिला कलगुटकर)